ISSN 2231 4342

Akhil Maharashtra Itihas Parishad's


# "SHODH NIBANDH SANGRAH"


## Multi disciplinary International Research Journal
## Peer Reviewed

March 2021 Special Issue



Chief Editor
**Dr. Satish Kadam**
President,
Akhil Maharashtra Itihas Parishad







Guest Editor
**Dr. V. N. Bhosale**
Principal,
Shivaji Arts, Commerce & Science College,
Kannad. Dist. Aurangabad

Executive Editor
**Dr. Jagdish Bhelonde**
Head & Associate professor,
Shivaji Arts, Commers & Science College Kannad.



Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

Akhil Maharashtra Itihas Parishad's

# "Shodh Nibandh Sangrah"

Multi Disciplinary International Research Journal
Peer Reviewed
March 2021 Special Issue

**Chief Editor**

**Dr. Satish Kadam**

President,
Akhil Maharashtra Itihas Parishad

**Guest Editor**

**Dr. V. N. Bhosale**

Principal,
Shivaji Arts, Commerce & Science College,
Kannad. Dist. Aurangabad

**Executive Editor**

**Dr. Jagdish Bhelonde**

Head & Associate Professor,
Shivaji Arts, Commerce & Science College Kannad

**Price: Rs. 1000/-**

**Published by: President, Akhil Maharashtra Itihas Parishad.**
© All rights reserved with the authors & publisher

**Shodh Nibandh Sangrah**
**Peer Reviewed**
**Multi Disciplinary International Research Journal**
**ISSN 2231 4342**

# Editorial Board

## Chief Editor

**Founder** - Dr. Jaysingrao Pawar

## Editorial Board/Advisory Board

**President** - Dr. Satish Kadam
**Vice President** - Dr. Chandrakant Chavan
**Secretary** - Dr. Shivraj Bokade
**Joint secretary** - Dr. Kavita Tathed
**Treasurer** - Eng. Ramesh Chandankar

## Member

Dr. G.K. Mane
Dr. Somnath Rode
Dr. B.D. Kulkarni
Dr. Sarjerao Bhambare
Dr. Mrs. Aruna More
Dr. Zaker Pathan
Dr. Prashant Kothe
Dr. Narayan Gawali
Dr. Urmila Kshirsagar
Dr. Ravi Satbhai

**Published by: President, Akhil Maharashtra Itihas Parishad.**
© All rights reserved with the authors & publisher

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

# Review Committee

| | |
|---|---|
| Mr. Deepak Patil | Dubai (UAE) |
| Mr. Satish Kadam | Muscat (OMAN ) |
| Dr. Sudhir Bansod | Zurich (SWITZERLAND) |
| Dr. Maqsood Afajal Jagagirdar | Kalburgi (KARNATAKA) |
| Prof. Virendra Sharma | Jaipur (RAJSTHAN) |
| Dr. Mrs. Binda Paranjape | Banaras (UP) |
| Dr. Prashant Puranik | Bhopal (MP) |
| Dr. Yashvir singh | Charkhidaddri (HARIYANA) |
| Dr. Shivratna Shete | Solapur (MAHARASHTRA) |
| Shri. Yadavrao Kandkurtikar | Nijamabad (AP) |
| Dr. Sopanrao Nimbore | Ashti (Maharashtra) |

Our editors have reviewed paper with experts committee, and they have checked the paper on their level best to stop furtive literature. except it, the respective authors of the papers are responsible for originality of the paper and intensive thoughts in the papers.

**Published by: President, Akhil Maharashtra Itihas Parishad.**
© All rights reserved with the authors & publisher

ISSN 2231 4342

# Index


| Sr. No. | Name of the Paper | Author/Researcher | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Agricultural Traditions As Seen Through Kalpasūtras | Dr. Mugdha Kulkarni | 1 |
| 2 | Impact of Economic Growth on Employment In India | Dr. Mule P. M | 6 |
| 3 | Human Right and Women Empowerment | Miss. Pranoti Maruti Patil | 10 |
| 4 | Evaluation of Soft Computing Methods in Robotics | Antima Bhimrao Shendge | 14 |
| 5 | A Brief Introduction of Samagra Vachana Samputa | Dr. Nalini Avinash Wghmare | 19 |
| 6 | Ayurveda-New Approches In 21St Century | Dr.H.M. Shaikh | 27 |
| 7 | A Oral History : New Research Methodology in History | Dr. Dharmraj Shivaji Pawar | 33 |
| 8 | Study Of Relogious Symbolson The Pillars of Thechaitya of Bedse Cave Complex To Speculate About the Age of Bedsechaitya | Samir Mankar | 40 |
| 9 | Psychology Into The 21st Century | Dr. Ghoti R.M. | 49 |
| 10 | Study of Zooplankton of Bori Reservoir Vasant Nagar, Naldurg | Dr. Shashikala Laxman bhalkare | 57 |
| 11 | The Perspectives of English Coaching in India | Dr. Brahaspati N. Waghmare | 62 |
| 12 | Why India Needs A Uniform Civil Code? | Laxmikant B. Kurangal | 68 |
| 13 | Conservation of Southern Kolhapur Historical Heritage Forts and Monuments | Dr. M.V. Jadhav | 73 |
| 14 | Sati Rite : An Historical Approach | Dr. Mubaraque Quraishi | 79 |
| 15 | Status Of Women In Vedic Society | Mr. Ramdas Yede | 85 |
| 16 | Pegasus in Western Indian Caves – A Study in Context | Dr. Manjiri Bhalerao | 92 |
| 17 | Dalit Buddhist Movement Past and Present | Dr.Sambhaji Sopanrao Darade | 95 |
| 18 | National Education Policy 2020: A Structural Reformation in Education | Dr. Meena Wadgule | 100 |
| 19 | CBCRC- Channel and Buffer Occupancy based congestion reduction in wireless cluster communication | Sudhir Arjunrao Shinde | 110 |
| 20 | जैन साहित्य में वर्णित आर्थिक तत्त्वों का ऐतिहासिक अध्ययन | डॉ. प्रा. कविता आर. तातेड | 122 |

ISSN 2231 4342


| | | | |
|---|---|---|---|
| | | डॉ. शरद गावंडे | |
| 40 | छत्रपती शिवाजी राजांच्या स्वराज्याची अर्थनिती | प्रा. डॉ. श्रद्धानंद बा. माने | 240 |
| 41 | शिखर महादेव मंदिर, तेर, ता. जि. उस्मानाबाद एक पुरातत्वीय अभ्यास | श्री. अमोल नारायण गोटे | 244 |
| 42 | छत्रपती शिवाजी महाराजांचे जलव्यवस्थापन | प्रा. दिनेश आर. कचकुरे | 251 |
| 43 | अकोला जिल्हयातील ब्राम्हणेतर व सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्ते | डॉ. श्याम प्रकाश देवकर | 256 |
| 44 | भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी: अरुणा असफ अली | प्रो. डॉ. हणमंत महादेव लोंढे | 263 |
| 45 | म्हसला तालूक्यातील उपेक्षित ऐतिहासिक स्थळांचे महत्व | प्रा. डॉ. संजय उत्तम बेंद्रे | 268 |
| 46 | हैद्राबादच्या निजामाचे मराठवाड्यातील शेतकरी व शेतमजुरांविषयीचे आर्थिक धोरण व परिणाम | प्रा. डॉ. कोंडेकर आर.एस. | 272 |
| 47 | सण, उत्सव व पर्यावण | Telsang Hanamant Bhimrao | 282 |
| 48 | खोती पध्दती आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर | प्रा. डॉ. गिरे संजय भाऊराव | 280 |
| 49 | महाराष्ट्रतील पर्यटन स्थळे : एक दृष्टीक्षेप | प्रा. डॉ. एच. टी. सातपुते | 289 |
| 50 | प्रतापगड किल्ल्याचे ऐतिहासिक महत्व | डॉ. सुखदेव पांडुरंग शिंदे | 294 |
| 51 | उत्तर कोकणातील आदिवासी समाजाचे होळी सणातील संस्कृतीदर्शन | प्रा. डॉ. एम. जी. मोरे | 299 |
| 52 | भारताची सार्क संघटनेतील भूमिका | प्रा. डॉ. अंबादास नरहरी | 303 |
| 53 | निसर्गयात्री मंडळ-एक सामाजिक संस्था | डॉ. भारती कुमार सुडके | 309 |
| 54 | गांधीजींची आत्मकथा आणि महाराष्ट्र | प्रा. डॉ. गणेश राऊत | 314 |
| 55 | शिवकालीन शस्त्रे | डॉ. विनोद बाबुराव बोरसे | 320 |
| 56 | सर्वव्यापी सुधारक महात्मा फूले यांच्या पुर्व आणि समांतर महाराष्ट्र: एक अभ्यास | डॉ. सुनिलचंद्र सोनकांबळे | 328 |
| 57 | एकविसाव्या शतकातील गावगाडयाचे स्वरूप | डॉ. रामचंद्र झाडे | 333 |
| 58 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक विचार | प्रा. सतीश कुंडलिकराव खरात | 336 |
| 59 | नरहर कुरुंदकरांचे हैदराबाद मुक्तिसंग्राम विषयक इतिहासलेखन | डॉ. क्षिरसागर बी. एस. | 340 |
| 60 | छत्रपती राजर्षी शाहू महाराजाचा आरक्षणाचा ऐतिहासिक निर्णय | प्रा. गायकवाड बाळू भिमराव | 347 |
| 61 | रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांची इतिहास विषयक दृष्टीव" | प्रा. विशाल रामदास रोकडे | 351 |
| 62 | महाभारत कालीन ब्रम्हवादिनी विदुला | वाघ जालिंदर पांडुरंग | 356 |
| 63 | भारताची अण्वस्त्रविषयक नीती – १९९८ पर्यंत | डॉ. श्रीरंग शामराव लोखंडे | 361 |

**Shodh Nibandh Sangrah**
**Peer Reviewed**
**Multi Disciplinary International Research Journal**
**ISSN 2231 4342**

# ''रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांची इतिहास विषयक दृष्टी''

**प्रा. विशाल रामदास रोकडे**
इतिहास विभागप्रमुख,
श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज
ता.पारनेर, जि.अ.नगर, ४१४३०६
मो.नं. : ९९७०७१७१४८
ई-मेल : vish.unipune@gmail.com

**प्रस्तावना :**

डॉ.आर.सी. मुजुमदार यांनी म्हटल्याप्रमाणे भारतात ख-या अर्थाने इतिहास लेखनाची परंपरा १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सुरु झाली. हा ब-याच अंशी पाश्चात्य शिक्षणाचा व पाश्चात्य इतिहासाच्या अध्ययनाचा परिणाम होता. पाश्चिमात्य जगात प्रचलित असलेला शास्त्रशुध्द व तटस्थतावादी इतिहास लेखनाचा प्रवाह भारतात रुढ करणारे व त्यानुसार भारतीय इतिहासाचे अध्ययन व लेखन करणारे जे भारतीय विद्वान व साक्षेपी इतिहास अभ्यासक १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात झाले. त्यात रियासतकार सरदेसाई यांचे स्थान अग्रगण्य आहे. त्यांनी प्रामुख्याने मराठयांचा इतिहास हा आपला प्रांत निश्चित केला असला तरी इतिहासाच्या अध्ययनाबाबत लेखनाबाबत त्यांनी सखोल चिंतन केले होते. त्यामुळेच 'रियासतकार' ही त्यांना मिळालेली उपाधी समर्पक ठरते. सरदेसाई यांनी आपली दिर्घ हयात इतिहासाच्या सेवेत व्यतीत केली. मराठी सत्तेचा सलग इतिहास लिहीण्याचे मोलाचे कार्य सरदेसाई यांनी केले. त्यांच्यापुर्वी स्प्रिंगल, स्कॉट वायरिंग व मुख्यतः ग्रँट डफ यांनी मराठयांचा इतिहास ग्रंथित केला असला, तरी तो इतिहास किती तरी अधिक विस्ताराने, प्रचंड परिश्रम करुन सरदेसाईसारख्या मराठी माणसाने तो शब्दबद्ध केला. या दृष्टीने त्यांचे लेखन कार्य हे प्रशंसनीय ठरते.

सरदेसाई आपल्या 'माझी संसारयात्रा' या आत्मचरित्रात म्हणतात की, ''इतिहासकाराने आपली भूमिका न्यायाधिशाप्रमाणे सर्वथा निर्विकार ठेवली पाहिजे. जसा पुरावा पुढे येईल तसा तसा आपला निष्कर्ष बदलत जावा, त्यात पूर्वग्रह बिलकूल असू नये.'' यावरुनच आपणास लक्षात येईल की इतिहासविषयक त्यांचा असणारा दृष्टिकोन हा संकुचित वा स्थितप्रज्ञ असा नव्हता तर ते इतिहासाकडे शास्त्रीय व समिक्षात्मक दृष्टिकोनातून बघतात असे असले तरी ते शास्त्रीयतेचा अतिमारा न करता वैचारिक व तटस्थतावादी ऐतिहासिक दृष्टीकोनाचा अवलंब करताना दिसून येतात.

**रियासतकार सरदेसाईची 'इतिहास' विषयक संकल्पना :**

रियासतकार सरदेसाई म्हणतात की, ''इतिहास हा विषय इतका व्यापक, उपयुक्त व गहन आहे, की त्याच्या स्वरुपांचे वर्णन थोडक्यात करणे शक्य नाही. सृष्टिक्रमाच्या आरंभापासून आजपावेतो मनुष्याची प्रगती

कसकशी होत गेली हयांचे तात्वीक विवेचन म्हणजेच 'इतिहास' होय. इतिहास विषयक संकल्पनेद्वारे आपणास असे दिसून येते की, त्यांचा 'इतिहासाकडे' पाहण्याचा दृष्टिकोन हा संकुचित नसून व्यापक असाच आहे. तसेच त्यांच्या सबंध लिखानाद्वारे याचा परिचय आपणास येतो.

**रियासतकार सरदेसाई यांचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन :**

रियासतकार हे बडोद्यास सयाजीराव गायकवाड यांच्या सेवेत असताना सयाजीराव हे इ.स. १९०५-१९०६ मध्ये युरोपात प्रवास करुन आले व त्यांनी इतिहासाचे महत्त्व ओळखून सरदेसाई यांना 'प्राचीन ग्रीस देशाचा इतिहास' शब्दबद्ध करण्यास सांगितला यावेळी सरदेसाई यांनी तो अनेक साधनांच्या सहाय्याने लिहीला. यावेळी सरदेसाई हे ग्रिकांच्या इतिहास लेखनास महत्त्व देताना दिसतात. ते यावेळी असे मत मांडतात की, प्राचीन ग्रिक संस्कृती आधीही भारतीय तसेच चिनी संस्कृती ह्या अधिक विकसीत होत्या, परंतू असे असले तरी ग्रीक लोकांस महत्त्व येण्याचे कारण असे की ऐहिक व्यवहारात विचारशक्तीचा स्वतंत्र उपयोग हा प्रथम ग्रीक लोकांनी केला. उदाहरणार्थ - ग्रीक लोकांनी लहान लहान अनेक प्रजासत्ताक शहरे स्थापन केली. इतर अनेक राष्ट्रांत यावेळी लष्करी राजेशाही होती.

एकूणच असे दिसून येते की, वरवर पाहता सरदेसाई हे हिंदूत्ववादी दृष्टिकोन मांडताना दिसतात परंतू ग्रीकांची महत्तमता मान्य करुन ते शास्त्रीय व वैश्विक विवेकवादी दृष्टिकोनाचा अवलंब करताना दिसून येतात. सरदेसाई यांनी स्पेन्सर, डार्विन, हेगेल या शास्त्रज्ञांच्या ग्रंथांचे वाचन केले. यावर सरदेसाई असे म्हणतात की, ''अशा चिकीत्सक व बौध्दिक विचारांची पुस्तके वाचल्यावर माझी पूर्वीची धार्मिक अंधश्रध्दा नाहीशी होऊन मी एक प्रकारचा निरीश्वरवादी, विचारास पटेल ते आचरणात आणणारा स्वतंत्र विचारी बनलो तसेच मी स्वतंत्र विचाराने शास्त्रीय शोधांचे ग्रहण करत आलो आहे.'' त्यांच्या या विचारांतून व लेखनशैलीद्वारे असे दिसून येते की, ऐतिहासिक मांडणीसाठी आवश्यक असणारी विचारसरणी त्यांनी अवलंबिली होती तसेच त्याद्वारे त्यांनी ऐतिहासिक दृष्टिकोनाचा अवलंब केल्याचे स्पष्ट दिसते.

**सरदेसाई व मराठी इतिहासकारांची दृष्टी :**

सरदेसाई यांनी ज्या काळात लिखानास सुरुवात केली त्यावेळी 'मराठा' इतिहासाविषयी झालेले लिखान हे केवळ राष्ट्रीय भावनेतून वा परिप्रेक्षातून झालेले दिसून येते. यावेळी 'मराठी' इतिहासकार हे दोन अवस्थांतून जाताना दिसतात. यात,

१) वसाहतवादी लिखानाविरुध्दची प्रतिक्रिया व

२) मराठी माणसांकडून मराठयांच्या इतिहासविषयक लिखान.

या दरम्यानच्या काळातच वा.कृ. भावे यांनी इ.स.१९२९ च्या दरम्यान 'पेशवेकालीन महाराष्ट्र' हे पुस्तक लिहिले. या लिखानाबरोबरच हळूहळू त्यादृष्टिने इतरही लिखान पुढे येताना दिसते. यावेळी या विद्वानांनी चालत आलेल्या राजकीय दृष्टिकोनाबरोबरच त्यात सामाजिक अंगाने मांडणी केलेली दिसून येते. सरदेसाईच्या लिखानाच्या बाबतीत विचार करता त्यांची सबंध मांडणी ही राजकीय विचारसरणीवरच आधारित असल्याचे दिसते. त्यात त्यांनी सामाजिक विचारसरणी कुठेही मांडलेली दिसून येत नाही. असे असले तरी त्यांची ही

कामगिरी एवढयाशा विचारांवरती कमी ठरते असे नाही तर त्यांचे सबंध लिखान हे एक प्रकारे नवीन इतिहासकार व तत्त्ववेत्यांसाठी मौलिक व सहाय्यभूतच ठरते.

**एक इतिहासकार म्हणून सरदेसाई :**

गिबन, मेकॉले, सरकार यांच्या तोडीचा इतिहासाचा प्रचंड उद्योग सरदेसाई यांनी केला. शेजवलकर यांनी 'जर्मन इतिहासकार मॉन्सेन याच्या तोडीचा उद्योग महाराष्ट्रात एकट्या सरदेसाई यांनी करुन दाखवला' अशी प्रशंसा करतात. वासुदेवशास्त्री खरे यांनी 'मराठयांचा चालताबोलता इतिहास' अशीच त्यांच्या कार्याची नोंद केलेली आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांनी सरदेसाईंना 'इतिहासमार्तंड' असे संबोधले आहे. तर ज्यांना बंगालचे गिबन म्हणून ओळखतात व सरदेसाईंशी निकटचा संबंध असणारे सर जदूनाथ सरकार हे त्यांच्याबाबतीत '<u>The Gretest Living historian of Maharashtra</u>' म्हणजेच 'महाराष्ट्राचा हयात असलेला सर्वश्रेष्ठ इतिहासकार' असे संबोधतात. 'महाराष्ट्रातील कर्त्या पुरुषांची मोजदाद' या सांख्यिकी पध्दतीने मराठी समाजाची गुणवत्ता मोजणा-या आपल्या अतिशय प्रसिध्द निबंधात इतिहासाचार्य राजवाडे यांनी रियासतकार सरदेसाई यांची 'इतिहासलेखक' म्हणूनच गणना केलेली आहे.

सरदेसाईचे थोडे पण अर्थपूर्ण बोलणे हेच भाषाप्रभुत्व या श्रीहर्षाच्या उक्तीला उतरणारा 'पानिपत' प्रकरणाचा समारोप त्यांनी चार वाक्यांत केलेला दिसतो. यात ते म्हणतात की, ''पानिपतचा संग्राम मराठयांची किर्ती यावच्चंद्रदिवाकरौ उज्ज्वल राखील; कितीही राज्यक्रांत्या किंवा घडामोडी झाल्या तरी पानिपतच्या आठवणीने मराठयांच्या बाहूंस सदैव स्फुरण चढेल; आणि कोणत्याही देशाचे राज्य करण्यास मराठे सर्वथैव लायक आहेत, याची खात्री हा एकच प्रसंग निरंतर पटवीत राहील, यात तिळमात्र शंका नाही'' यासंदर्भात न.र.फाटक यांनी म्हटले आहे की, ''गिबन, मेकॉले, कार्लाइल, फ्रुड, फ्रीमन, ग्रीन, अर्नाल्ड हे इंग्रज इतिहासकार मार्मिक ज्ञानाच्या विपुलतेप्रमाणेच भाषासौष्ठवासाठीसुध्दा प्रख्यात आहेत. मराठीत अजून अव्वल दर्जाचा इतिहासकार झालेला नाही. नानासाहेब हेच काय ते इतिहासकार आहेत''.

'उत्तमा आत्मना ख्याता' या न्यायाने स्वतःच्या कर्तुत्त्वाने व कष्टाने सरदेसाई यांनी आपले इतिहासविषयक लिखान केले, म्हणूनच सरदेसाई यांना 'रियासतकार' ही पदवी मिळाली आहे. सरदेसाई यांची अवास्तव स्तुती, अर्थगौरव अथवा शब्दांची कसरत नव्हे तर ती वस्तुस्थिती आहे. ते एक इतिहासकारच होते. त्यांनी जे 'नानासाहेब पेशवे' चरित्र लिहीले त्यासाठी त्यांनी शेजवलकरांसारख्या विद्वानास त्यासाठी प्रस्तावना लिहावी असे सुचविले. शेजवलकरांसारख्या चिकीत्सक इतिहासाभ्यासकाने त्या चरित्राची चिकीत्सा करुन त्यास प्रस्तावना लिहील्याचे दिसते. यावरुनच असे दिसते की त्यांनी आपल्या लिखानात ऐतिहासिक पध्दती वापरल्याचे जाणवते.

**समारोप :**

भारतामध्ये एकोणिसाव्या शतकात ख-या अर्थाने वैचारिक परिवर्तन सुरु झालेले दिसून येते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मात्र इतिहासविषयक लिखानास गती मिळाल्याचे दिसते. यात रियासतकार सरदेसाई यांनी जे काही इतिहासविषयक लिखान केले त्याचाही अभ्यास करणे महत्त्वपूर्ण ठरते. रियासतकारांनी

 ISSN 2231 4342

आपल्या ९५ वर्षाच्या काळातील पहिल्या साठ वर्षाच्या काळात सयाजीरावांच्या पदरी असताना इतिहास लिहीण्यास सुरुवात केली व पुढे जवळजवळ तीस वर्षे त्यांनी इतिहासाचे पवित्र असे कार्य केले.

एकांगी दृष्टिकोन, आपल्या सोयीप्रमाणे पुराव्यांचा उपयोग आणि ऐतिहासिक पद्धती; तसेच पूर्वग्रह आणि पक्षपातीपणा अशा अनेक दोषांपासून सरदेसाई यांनी मुक्त राहण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. तरीही मनुष्य स्वभावाला अनुसरुन त्यात काही विद्वान त्यांस 'संकलनकार' संबोधतात. तथापी असे दोष आपल्या लेखनात राहू नयेत असा मात्र त्यांनी बुद्धिपुरस्पर प्रयत्न केला आहे. तसेच त्यांच्या लिखानाची रित ही एक 'इतिहासकार' असल्याचेच दर्शविते. अर्थातच नव्या संशोधनाच्या प्रकाशात रियासतीत काही उणिवा आढळणेही स्वाभाविक आहे. परंतू त्या उणिवा काढून टाकण्याचा प्रयत्न करणे आणि रियासतीला अद्ययावत रुप देण्याचे आव्हान हे नवसंशोधक इतिहासकारांपुढे आहे. एकुणच रियासतकार सरदेसाईचा इतिहासविषयक दृष्टिकोनाचा विचार करता इतिहास हाच त्यांच्या लिखानाचा आत्मा असल्याचे दिसून येते.

**संदर्भग्रंथसूची :**

**<u>प्राथमिक साधने :</u>**

1) सरदेसाई गोविंद सखाराम, 'ग्रिस देशाचा संक्षिप्त इतिहास', प्रकाशक दामोदर सावळाराम आणि मंडळी, सन १९०८.
2) सरदेसाई गोविंद सखाराम, 'श्री.सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासांत', प्रकाशक एस्. जगन्नाथ आणि कंपनी, पुणे, सन १९५६.
3) सरदेसाई गोविंद सखाराम, 'माझी संसारयात्रा', प्रकाशक – केशव भिकाजी ढवळे, मुंबई, पहिली आवृत्ती १९५६.
4) सरदेसाई गोविंद सखाराम, 'मुसलमानी मराठी रियासत', खंड १ ते ८, संपादक, स.मा.गर्गे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सुधारीत आवृत्ती.
5) सरदेसाई गोविंद सखाराम, 'नानासाहेब पेशवे', प्रकाशक एम.एन.कुलकर्णी, भारतगौरव ग्रंथमाला, मुंबई, १ ऑगस्ट १९२६.
6) पंत अमात्य, 'बावडा-दफ्तर', संपादक – केशव गोविंद सबनीस, प्रकाशक – सेक्रेटरी ज.बावडा, कोल्हापुर, १९३७.
7) शेजवलकर यं.शं., 'शेजवलकरांचे लेख', प्रकाशक – ह.वि.मोटे, मुंबई, मुंबई, १९५९.
8) भावे वा.कृ. 'पेशवेकालीन महाराष्ट्र', प्रकाशक –भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, १९७६.

ISSN 2231 4342

**दुय्यम साधने :**

१) आपटे भा.क्रृ., हेर्लेकर सुलभा, गर्गे स.मा., 'मराठी वाङ्मय कोश-खंड २, भाग१, संपादक, डॉ.गो.म.कुलकर्णी, प्रकाशक-सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती २००३.

२) कोठेकर शांता, 'इतिहास : तंत्र आणि तत्त्वज्ञान', श्रीसाईनाथ प्रकाशन, नागपुर, प्रथमावृत्ती २००५.

३) कुलकणी अ.रा., 'मराठयांचे इतिहासकार' , प्रकाशक-दत्तात्रेय ग.पाष्टे, डायमंड पब्लिकेशन, पुणे २००७.

४) पुराणीक श.श्री., 'रियासतकार गो.स.सरदेसाई', श्री.गंधर्व वेद प्रकाशन (महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवी वर्ष), पुणे, २०१०.